# सीए परीक्षेत व्यंकटेश च्या विद्यार्थ्यांची यशाची परंपरा कायम

सीए च्या फायनल परीक्षेमध्ये एकूण आठ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाल्याबद्दल ना.बा. एज्युकेशन संस्थेचे चेअरमन श्री. कृष्ण बोहरा शेठजी यांनी पुष्पगुच्छ देऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्कार प्रसंगी संस्थेचे प्रेसिडेंट श्री. श्रीनिवास बोहरा, व्हाईस चेअरमन श्री. उदयजी लोखंडे उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये सीए परीक्षा केंद्र असून कोल्हापूर, इचलकरंजी तसेच इचलकरंजी शहरा भोवताली असणाऱ्या खेड्यातील अनेक विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पुणे किंवा कोल्हापूर या ठिकाणी जाण्यासाठी होणारी गैरसोय संपुष्टात आली. इचलकरंजी शहरातील अनेक प्रतिष्ठित सीए हे श्री. व्यंकटेश महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत, कॉमर्स शाखेतील प्रतिष्ठित व गुणवत्तापूर्ण महाविद्यालय अशी शिवाजी विद्यापीठांमध्ये श्री व्यंकटेश महाविद्यालयाची ओळख असून दरवर्षी या महाविद्यालयाच्या सीए, सीएस अशा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येते. भावना खारलोया, साहिल बारगीर, माहेश्वरी घाटगे, विनायक कुंभार, नितीन पगाणीस, विशाल मुंदडा, प्रथमेश नाईक, योगेश जानगीड अशी यंदाच्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत. सीए परीक्षेत उत्तीर्ण होण्याची ही व्यंकटेश महाविद्यालयाची पूर्वीपासून ची परंपरा आहे त्यामध्ये या आठ विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे व्यंकटेश महाविद्यालयाच्या शिरपेचा मध्ये आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला याचा सार्थ अभिमान महाविद्यालयास व संस्थेस आहे असे उदगार, संस्थेचे चेअरमन यांनी केले. व्यंकटेश महाविद्यालय 'कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटट' (CMA) नावाचा कोर्स नव्याने सुरू करत असून सीए सोबत सीएमए देखील विद्यार्थ्यांना चांगली रोजगाराची संधी उपलब्ध करून देईल अशी खात्री चेअरमन यांनी व्यक्त केली. गेल्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये ६५ हून अधिक विद्यार्थ्यांनी सीएच्या फायनल परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे आणि याही वर्षी व्यंकटेशच्या आठ विद्यार्थ्यांनी ही परंपरा कायम राखली असे गौरवदगार श्री वेंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले. दरवर्षी अनेक विद्यार्थी बी.कॉम. चे शिक्षण घेत असतानाच सीए साठी प्रवेश घेतात व फाउंडेशन, इंटरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण होणारे अनेक विद्यार्थी श्री व्यंकटेश महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत असेही ते म्हणाले. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये सीए साठी आवश्यक पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत, मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करून दिली आहे म्हणूनच विद्यार्थी यशाची उत्तुंग शिखरे पदाक्रांत करीत आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले. सत्कार प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.


Viraj Vijaykumar Demanna
Venkatesh Govind Parekh
Santosh Nillappa Jatvar
Shivani Nandkumar Badkat
Poorva Appaso Jangle
Ajay Suresh Patil
Mr. Pramod Kamble
Mr.Swapnil Pol
Ms. Kiran Magdum
NOTICE BOARD